# महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

क्रमांक : १४६०० / ड-१७(मराठी भाषा समिती)
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २२ ऑक्टोबर, २०२०.

**: : प रि प त्र क : :**

या सचिवालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना कळविण्यात येते की, या सचिवालयातील विविध कक्षांकडून वेळोवेळी विविध परिपत्रके, ज्ञापने, पत्रक भाग-दोन मध्ये समाविष्ट करावयाचे परिच्छेद, मंत्रालय व क्षेत्रीय स्तरावर करण्यात येणारा पत्रव्यवहार यामध्ये शुध्दलेखनाचे नियम पाळले जात नाहीत तसेच व्याकरणाच्या चुका झाल्याचे आढळून येते.

महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर राज्य विधीमंडळाने महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ पारीत केला. सदर अधिनियमातील तरतुदीनुसार सर्व प्रशासनिक वापराकरीता मराठीचा वापर अनिवार्य करण्यात आला आहे. वर्जित प्रयोजने वगळता सर्व प्रशासनिक कामकाज मराठीतून करणे बंधनकारक करण्यात आले असून मराठी भाषेचा प्रभावीपणे वापर करण्याबाबत शासनाने वेळोवेळी शासन निर्णय/परिपत्रके यान्वये आदेश दिले आहेत.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचा शासन निर्णय क्र.मभावा-२०१४/ (प्र.क्र.२५/२००४)/२०ब, मंत्रालय, मुंबई, दिनांक ६ नोव्हेंबर, २००९ नुसार सर्व शासकीय कार्यालये, निम-शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे, मराठी पाठयपुस्तके इत्यादीमध्ये मराठी भाषेचा वापर होतो त्यानुषंगाने देवनागरी लिपीतील प्रमाणीकृत मराठी वर्णमालेचा, अक्षरमालेचा व अंकांचा शासनाने स्वीकार केला आहे. कार्यालयातील कामकाज मराठी भाषेतून शंभर टक्के होण्याबरोबरच ते बिनचूक होणेही तितकेच आवश्यक आहे. त्यासाठी मराठी भाषेच्या शुध्दलेखनाच्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे. वर्णमालेच्या संदर्भातील स्पष्टीकरणे तसेच विशिष्ट अक्षरांच्या लेखनाबाबतच्या सूचना, स्वरचिन्हे, जोडाक्षरे, वर्णक्रम, लेखनात वापरावयाची विरामचिन्हे व अन्य चिन्हे, अंक, अंकाचे अक्षरी लेखन इत्यादीविषयी सविस्तर व सोदाहरण सूचना देणारी सात परिशिष्टे या शासन निर्णयासोबत जोडलेली आहेत. सदर शासन निर्णय महाराष्ट्र विधानमंडळ संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच शासकीय कामकाजात वारंवार वापरात येणाऱ्या अचूक शब्दांची यादी या परिपत्रकासोबत जोडली आहे.

..२/-

त्याचप्रमाणे भाषा संचालनालय या संस्थेनी "शासन व्यवहार शब्दकोश" ही आज्ञावली विकसित केली असून त्यामध्ये "परिभाषा कोश सूची" "शब्दावल्या व वाक्यप्रयोग" याचा समावेश आहे. कार्यालयीन कामकाज करताना या आज्ञावलीचा वापर करण्यात यावा जेणेकरुन मराठी भाषेच्या लेखनात एकरुपता राखण्यासाठी त्याचा उपयोग होईल.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांनी कार्यालयीन कामकाज करताना मराठी शुध्दलेखनाचे नियम पाळून कामकाज करावे.

**(मेघना तळेकर)**
उप सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**याची प्रत :**

१. मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे सचिव

२. मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी

३. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद/महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव

४. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष

५. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये

६. संगणक कक्ष (Website)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाकडून निर्गमित होणारी परिपत्रके, अधिसूचना, ज्ञापन, पत्रक भाग दोन व कार्यालयीन आदेश यामध्ये वारंवार आढळणारे शब्द.**

| अ.क्र | शब्द | अ.क्र | शब्द | अ.क्र | शब्द |
|---|---|---|---|---|---|
| १ | विधिमंडळ | ३५ | विवक्षित | ६९ | अनुकृती |
| २ | अनुपस्थित | ३६ | एकत्रित | ७० | प्रतिकृती |
| ३ | प्राधिकृत | ३७ | स्थापित | ७१ | उन्नती |
| ४ | चक्रानुक्रम | ३८ | अग्रेषित | ७२ | नवक्लृप्ती |
| ५ | दिनदर्शिका | ३९ | अधीनस्त | ७३ | प्रतिपूर्ती |
| ६ | अधीन | ४० | अनिवार्य | ७४ | टीप |
| ७ | कार्यवाही | ४१ | पदवीधर | ७५ | अतिथी |
| ८ | जाहीर | ४२ | राजीनामा | ७६ | वेतन निश्चिती |
| ९ | निवडणुका/निवडणूक | ४३ | मुदत | ७७ | बाधित |
| १० | घटित | ४४ | अंतरिम | ७८ | पुण्यतिथी |
| ११ | नामनियुक्ती | ४५ | आज्ञावली | ७९ | संमती |
| १२ | संदर्भाधीन | ४६ | सूचित | ८० | निधी/विधि |
| १३ | खाजगी | ४७ | वातानुकूलित | ८१ | कृती |
| १४ | निमंत्रित | ४८ | अद्ययावत | ८२ | क्रिया |
| १५ | घटित करणे | ४९ | वितरित | ८३ | प्रगतिशील |
| १६ | लेखापरीक्षा | ५० | पदोन्नती | ८४ | अनुमती |
| १७ | वसतिगृह | ५१ | पदावनत | ८५ | अवधी |
| १८ | स्वीकृत/स्वीकारणे | ५२ | मध्यान्होत्तर | ८६ | प्रतिनिधी |
| १९ | नूतन वर्ष | ५३ | पूरस्थिती | ८७ | गणपूर्ती |
| २० | संसदीय | ५४ | कक्षबंध | ८८ | शिष्यवृत्ती |
| २१ | अर्थसंकल्पीय | ५५ | राखीव | ८९ | व्याप्ती |
| २२ | विचारविनिमय | ५६ | उपरोल्लिखित | ९० | स्वीकृती |
| २३ | प्रक्रिया | ५७ | सुपूर्द | ९१ | अपील |
| २४ | नामाभिधान | ५८ | सार्वत्रिक | ९२ | टिप्पणी |
| २५ | शिफारशी | ५९ | पीठासीन | ९३ | तरतूद |
| २६ | संस्थगित | ६० | निर्गमित | ९४ | संपत्ती |
| २७ | गृहीत | ६१ | आचारसंहिता | ९५ | कार्यमुक्ती |
| २८ | पुर:स्थापित | ६२ | शपथविधी/शपथ ग्रहण विधी | ९६ | विमुक्ती |
| २९ | ध्वजारोहण | ६३ | उपाहारगृह | ९७ | भूमी |
| ३० | तपशील | ६४ | विनियोग | ९८ | अस्वीकार्य |
| ३१ | अधिसूचना | ६५ | समिती | ९९ | कायदेशीर |
| ३२ | निवड सूची | ६६ | तारांकित | १०० | पद्धती |
| ३३ | नमूद | ६७ | तूर्त | १०१ | प्रसूती रजा |
| ३४ | मूलभूत अधिकार | ६८ | वैधानिक | १०२ | अग्रिम बिल |

| अ.क्र. | शब्द | अ.क्र. | शब्द | अ.क्र. | शब्द |
|---|---|---|---|---|---|
| १०३ | प्रतिकूल | ११० | अपिलीय प्राधिकारी | ११७ | गैरशिस्तपणा |
| १०४ | अधिनियम | १११ | अनौपचारिक | ११८ | प्रकाशित |
| १०५ | परिवर्तित | ११२ | पदग्रहण अवधी | ११९ | मूल्यांकन |
| १०६ | दिरंगाई | ११३ | निवृत्तिपूर्व रजा | १२० | वैद्यकीय |
| १०७ | पूर्वमंजुरी | ११४ | तात्पुरता | १२१ | सांविधिक |
| १०८ | अतिरिक्त | ११५ | विषयसूची | | |
| १०९ | आर्थिक पाहणी | ११६ | वार्षिक वित्तीय विवरणपत्र | | |